# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या नोंदीबाबत**

**(१) ११८९१ (०८-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्ते ज्यावेळी २६ नंबरांतर्गत ग्रामपंचायत दप्तरी नोंद केली जाते त्यांनतर त्याची नोंद भूमिअभिलेख कार्यालयामध्ये जमिनीच्या नकाशामध्ये रस्त्याची नोंद दाखवली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्यावेळी एखादया जमिन मालक भूमीअभिलेख कार्यालयात नकाशा मागणीसाठी गेला असता आपल्या जमिनी मध्ये रस्ता कोठून कोठे गेला आहे हे याचा बोध होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे प्रसंगी जमिन मालकाला आपल्या जमिनीमध्ये नुकसान झाल्याचे आढळून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत योग्य ते बदल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी ग्रामीण रस्ते व ग्रामीण पाऊलवाट नव्याने बांधल्यानंतर अशा रस्त्यांची किंवा पाऊलवाटांची माहिती जिल्हयाच्या, तालुक्याच्या व गावाच्या नकाशावर दाखविण्यासाठी महसूल खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्याबाबत दिनांक २२ ऑक्टोबर, १९८६ च्या शासन निर्णयाद्वारे सूचना देण्यात आलेल्या ओहत. सदरील शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत महसूल व वन विभागानेही दिनांक ०४ नोव्हेंबर, १९८७ च्या शासन निर्णयान्वये सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करणेबाबत तसेच, पंचायतीकडे हस्तांतरण करण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तांच्या नोंदी ग्रामपंचायतीच्या अभिलेख्यांत व त्याप्रमाणे महसूल विभागाच्या अभिलेख्यांत आवश्यक नोंदी/फेरफार करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ च्या शासनपत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील गायरान जमिनीत ग्रामसेवकाने घर बांधून अतिक्रमण केल्याबाबत**

**(२) १३९२६ (०७-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील गायरान जमिनीत ग्रामसेवकाने घर बांधून अतिक्रमण केल्याचे निवेदन तहसिलदार वडूज यांना दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०८-२०१६) :**(१) होय,

(२) सदर अतिक्रमण क्षेत्राची पाहणी गट विकास अधिकारी पंचायत समिती खटाव व संबंधित विस्तार अधिकारी व ग्रामसेवक भांडेवाडी यांनी केलेली आहे.

(३) पाहणीच्या निष्कर्षानुसार सदर गायरान क्षेत्र हे ग्रामपंचायत भांडेवाडी, ता.खटाव यांच्या ताब्यात आहे. अतिक्रमण काढण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला असल्याने सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत भांडेवाडी, ता.खटाव यांनी दिनांक २०.१०.२०१४ तसेच २४.१२.२०१४ रोजी अतिक्रमण काढण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. मौजे भांडेवाडी, ता.खटाव येथील गायरान क्षेत्रामध्ये एकूण १५२ खातेदारांनी अतिक्रमण केलेले आहे. गायरान क्षेत्रामध्ये झालेल्या अतिक्रमणाच्या हद्दी कायम करणे कामी ग्रामपंचायतीने उप अधिक्षक, भूमी अभिलेख खटाव (वडूज) यांचेकडे मोजणीसाठी अर्ज केला होता. सदर मोजणीचे कामकाज दिनांक ३.१०.२०१५ रोजी पुर्ण झाले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५२ व ५३ अन्वये नियमानुसार अतिक्रमणे काढण्याची कारवाई करणेबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती खटाव यांचेमार्फत ग्रामपंचायत भांडेवाडी, ता.खटाव यांना दिनांक १४.९.२०१५ व दिनांक ३०.११.२०१५ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) वर (३) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही सुरु असल्याने विलंब झालेला नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मौजे हेळवाक येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत**

**(३) ४१२४९ (०६-०५-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मौजे हेळवाक येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमतांनी विभागीय आयुक्त पुनर्वसन यांच्या नावाचे बनावट सहीचे शिक्के तयार करुन ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये सरकारी गावठाण फेरफार नं.३८७ हा रद्द झाला असल्याचे पत्र ग्रामसभेत सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यमान सरपंच व ग्रामसेवक यांनी पदाचा गैरवापर करुन विभागीय आयुक्त, पुनर्वसन यांच्या नावाचा सही शिक्का तयार करुन याव्दारे बनावट पत्राचे वाचन करुन ग्रामस्थांची दिशाभूल केल्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्त यांचेकडे तक्रार दाखल केली असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करुनही या प्रकरणात महसूल विभागाकडून दिरंगाई केली जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) ग्रामस्थांनी तक्रार केली हे खरे आहे.

(३) होय, चौकशी करण्यात आली असून भाग (१) मधील नमूद पत्र ग्रामपंचायतीच्या अभिलेखात आढळून आले नाही. तसेच ग्रामपंचायत हेळवाक च्या दिनांक २८.३.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या प्रोसेडिंगमध्ये सदरील बोगस पत्राचे वाचन करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदर बोगस पत्राच्या अनुषंगाने चौकशी होणे आवश्यक असल्याने याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांना शासनपत्र क्र. विअताप्र-२०१६/प्र.क्र.१६३/पंरा-३, दि.२६/०८/२०१६ च्या पत्रान्वये आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील मोर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्याला लाभक्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) ४६९६५ (३०-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मोर्णा पाटबंधारे प्रकल्पाचा कालवा अकोला शहरातून गेला असून वाढलेल्या शहरीकरणामुळे लाभक्षेत्र उपलब्ध नसल्याने अनेक वर्षापासून कालवा बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याचा भविष्यात पाटबंधारे विभागाकडून कालव्याचा उपयोग संबंधित खात्याकडून करण्यासाठी कोणताही प्रस्ताव किंवा नियोजन नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंद कालव्यामुळे शहरीवस्तीचे विभाजन झाल्याने सदर कालव्याच्या जागेवर रस्त्याचे बांधकाम करुन सार्वजनिक प्रयोजनासाठी कालव्याच्या जागेची मागणी महानगरपालिका, अकोला यांनी पाटबंधारे विभागात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाटबंधारे खात्याच्या अडवणूकीच्या धोरणामुळे महापालिकेने प्रस्तावित केलेल्या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासन कालव्याची जागा महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही.

(५) सदर बंद पडलेल्या कालव्याची जमीन ही जलसंपदा विभागाच्या मालकीची असून प्रचलित बाजारभावानुसार मुल्य भरून घेऊन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे. या संदर्भात क्षेत्रिय स्तरावरुन आयुक्त महानगरपालिका, अकोला यांना पत्र दि. २६.५.२०१६ नुसार अवगत करण्यात आले आहे.

---

**मलकापूर तालुक्यातील मौजे दुधलगाव ते मोरखेड खुर्द रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५) ४८४७३ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर तालुक्यातील मौजे दुधलगाव ते मोरखेड खुर्द हा एकूण ३ .मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे मातीकाम व खडीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या मातीकाम व खडीकरणासाठी ३५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन कार्यकारी अभियंता, जि.प. बुलडाणा यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) दुधलगांव बु. ते मोरखेड खु. हा रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा असून रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर रस्ता अस्तित्वात नसून नव्याने रस्त्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. ०/०० ते १/५०० कि.मी. लांबीतील रसत्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजुर आहे. त्यामुळे उर्वरीत १/५०० ते ३/०० कि.मी. लांबीमध्ये नवीन रस्ता करावयाचा असल्याने जिल्हा परिषदेकडील दिनांक ८.६.२०१६ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

---

## मलकापूर तालुक्यातील निमखेड ते दौलखेड प्रजीमाला जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(६) ४८४८३ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर तालुक्यातील निमखेड ते दौलखेड प्रजीमाला जोडणारा हा एकूण २ कि .मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे ग्रामस्थांना आवागमन करणे गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतूक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील निमखेड ते डौलखेड हा रस्ता सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.३७ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी २.६० कि.मी. आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम जिलहा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील हजारो शेतकरी व मजूर कामाकरिता दरवर्षी स्थलांतर करीत असल्याबाबत

**(७) ४८९२० (२५-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील हजारो मजूर दरवर्षी वसई, पालघर, मनोर, भिवंडी, ठाणे, गुजरात आदी भागात वीटभट्टी व बोटींवर मासेमारी कामाकरिता स्थलांतर, रोजगार हमी योजना राबविताना रोजगार कार्डावर चुकीच्या मूल्यमापनामुळे आदिवासींची फसवणूक, अत्यंत कमी रोजगार, पावसाळ्यात रानभाज्या विकणे, शेतात मजूरी करणे, स्थलांतरणामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष, कुपोषणाचे वाढते प्रमाण, गावे ओस पडत असून मजूरांच्या स्थलांतरणाचा हा गंभीर विषय असल्याचे दिनांक १८ जानेवारी ,२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, मजूरांच्या रोजगाराकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१०-११-२०१६) :**(१) रोजगाराअभावी पालघर जिल्ह्यातील मजुरांचे अन्यत्र स्थलांतर होत असल्याची बाब दि. १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली नाही. तसेच ठाणे जिल्ह्यातही अशी बाब नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात रब्बी हंगामासाठी खेळणा मध्यम प्रकल्पाच्या कालव्यांची झालेली दुरवस्था

**(८) ५०३१० (३०-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात रब्बी हंगामासाठी खेळणा मध्यम प्रकल्पातून पाण्याचे आवर्तन सोडताना प्रशासनाने कालव्यांची दुरुस्तीच न केल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) व (२) सन २०१५-१६ मधील आवर्तना वेळी साखळी क्रमांक ८८०० ते ९००० मी. भागातील कालव्यातून किरकोळ पाझर झाला होता, सदर पाझर थांबविण्याकरिता कालव्याची किरकोळ दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेटेकर-बोथली (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील मध्यम प्रकल्पाचे वेस्ट वेयरची उंची वाढविण्यास मंजूरी देण्याबाबत**

**(९) ५०४९३ (०५-०५-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेटेकर बोथली (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील मध्यम प्रकल्पाची वेस्ट वेअरची उंची वाढण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१६) :**(१) होय.
भंडारा जिल्ह्यातील बेटेकर बोथली मध्यम प्रकल्पाचे वेस्टविअरची उंची वाढविण्याचे काम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६/९/२०१५ रोजी शासनास निवेदन दिले होते.
(२) व (३) सदर प्रकल्पाच्या सांडव्याची उंची ०.६० मी ने वाढविण्यास्तव आवश्यक पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिनांक १०/११/२०१५ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांच्याकडून निर्गमित करण्यात आले आहे.
प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत १ टक्केपेक्षा जास्त वाढ होत असल्याने प्रकल्पाचे व्याप्तीत होणाऱ्या बदलाचे अनुषंगाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेण्याचा प्रस्ताव व कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

---

**राज्यातील आंतर जिल्हा बदलीतून होणाऱ्या पतीपत्नी एकत्रीकरणाचे शेकडो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ५०६८८ (१६-०५-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेकडो जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षक मागील ७ वर्षापासून जिल्हा बदलीने आस्थापना दिल्या नसल्यामुळे पती, पत्नी एकत्रीकरणातून होणा-या बदल्या प्रलंबित असताना लातूर जिल्हा परिषदने गैरमार्गाने आपसी बदल्या केल्याचे निवेदन शिक्षक सहकार कृती समितीने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतर जिल्हा बदलीतून होणा-या पतीपत्नी एकत्रीकरणाचे शेकडो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पती-पत्नी एकत्रीकरण करुन बदल्या करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे. संबंधित संघटनेने डिसेंबर, २०१५ मध्ये दिलेल्या निवेदनात शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीच्या समस्या/ सूचना मांडल्या आहेत.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे. मात्र सदरचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नसून संबंधित जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहेत.

सद्य:स्थितीमध्ये बिंदुनामावली अद्यावत करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आंतरजिल्हा बदलीने येणाऱ्या आवश्यक शिक्षकांना बिंदुनामावलीनुसार तथा सेवाजेष्ठतेनुसार सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोंढानेसह राज्यातील १५ धरणांच्या बांधकाम कंत्राटातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(११) ५०८६९ (३०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढानेसह राज्यातील १५ धरणांच्या बांधकाम कंत्राटातील गैरव्यवहाराची चौकशी सुरु केल्याने, या प्रकरणी दाखल केलेली मुळ याचिका निकाली काढावी व कंत्राटदारांची याचिका तसेच सरकारी तपास सुरु असल्याने, न्यायालयीन देखरेखीची गरज नसल्याची शासनाची मागणी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास फेटाळून लावली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालयात शासनाने न्यायालयाच्या देखरेखीची गरज नसल्याची तसेच याचिका निकाली काढण्याची मागणी करण्याची कारणे काय आहेत व कोणत्या आधारे सदरहू मागणी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, राज्यातील १५ धरणांच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६)** :(१) व (२) मयांक गांधी व इतर यांनी जनहीत याचिका ६३/२०१२ मध्ये मुळ याचिकेमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. याबाबत उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने प्रतिज्ञापत्रात राज्य शासनाने स्वत:हून या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत १२ प्रकरणाबाबत चौकशी सुरू केलेली आहे. तसेच वेळोवेळी न्यायालयास चौकशीबाबत सद्य:स्थिती अहवाल सादर केलेला आहे. त्याचप्रमाणे वन, जलसंपदा/पर्यावरण कायदाच्या तरतुदीच्या अनुषंगाने दाद मागण्यासाठी पर्यायी व्यवस्था

असल्यामुळे सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयात राज्य शासनाने न्यायालयाच्या देखरेखीची गरज नसल्याची तसेच याचिका निकाली काढण्याची मागणी करण्यात आली होती.
(३) रायगड जिल्हयातील बाळगंगा, काळू व कोंढाणे या प्रकल्पामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत शासकीय अधिकारी व कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उर्वरीत प्रकल्पांची ॲन्टी करप्शन ब्युरो मार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्ते विकास योजना राबविण्याबाबत**

**(१२) ५१८८६ (२८-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्ते विकास योजना राबवीण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, पाणंद रस्ते विकास योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१६) :**(१) होय. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत टंचाई भागात पांणद रस्त्यांच्या धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासन परिपत्रक दि.४/१२/२०१५ अन्वये घेण्यात आला आहे.
(२) व (३) राज्यातील टंचाई परिस्थिती विचारात घेवून टंचाईग्रस्त गावांमये जास्तीत जास्त पांधण रस्ते घेण्याच्या व ही को IPPE क्षेत्रात प्रामुख्याने घेताना त्यामध्ये स्मशानभूमीस जोडणारे रस्ते, शाळांना जोडणारे रस्ते व प्राथमिक आरोग्य केंद्रास जोडणारे रस्ते ही कामे प्राथम्याने घेण्याचे नियोजन आहे. सदर योजना सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील घोडनदी, मीनानदी व कुकडी नदीवरील ६७ कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(१३) ५१९७२ (२९-०४-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुकडी पाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील घोडनदी, मीनानदी व कुकडी नदीवरील ६७ कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी गेल्या दोन वर्षापासून निधी मिळालेला नाही त्यामुळे बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीनानदी, कुकडीनदी व घोडनदी वरील असलेल्या बंधाऱ्यात साठवण झालेल्या पाण्याचा लाभ २० ते ३० हजार हेक्टर शेतीला होत आहे परंतु अनेक बंधाऱ्यांमधून पाण्याची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६)** :(१) व (२) देखभाल दुरुस्तीसाठी प्रचलित मापदंडानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, व त्यामधून प्राधान्यक्रम ठरवून दुरुस्तीची कामे क्षेत्रिय स्तरावरुन केली जातात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यांतील लघु-पाटबंधारे व मध्यम प्रकल्प यांचे सर्वेक्षण होऊनही योजना सुरु न झाल्याबाबत

**(१४) ५२५५४ (२९-०४-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरगणा (जि.नाशिक) तालुक्यात माहे मार्च, २०१६ पर्यंत सिंचनाच्या लघु-पाटबंधारे, मध्यम प्रकल्प अशा किती योजना पूर्ण केल्या गेल्या आहेत,
(२) असल्यास, सुरगाणा तालुक्यातील एकूण किती क्षेत्र आज मितीस ओलीता खाली आहे व तेथील शेतकरी त्या पाण्यावर कोणती बागायती पिके घेत आहेत,
(३) असल्यास, सुरगाणा तालुक्यातील १) सतखांब २) सोनगीर ३) अलंगुण-१ ४) मालगोंदा ५) बोरीपाडा-१ ६) बोरीपाडा-२ ७) रगतविहिर ८) पिंपळसोंड ९) बाळओझर १०) आंबाठा ११) गुही १२) सुभाषनगर १३) दातरीचापाडा १४) करवंदे १५) वाघधोंड १६) उंबरविहिर १७) सालभोये १८) रोकडपाडा १९) थविलपाडा २०) सागपाडा २१) वांगण (सु) २२) अलंगुण-२ २३) हनुमंतमाळ २४) वांगणपाडा २५) भिंतघर २६) बिजुरपाडा २७) कोठुळे २८) चिंचपाडा २९) आमदा (प) ३०) खडकमाळ ३१) दुमीपाडा मध्यम प्रकल्प या योजनांचा कार्यान्वित झाल्यास किती पाणी साठा वाढणार आहे व त्याखाली किती जमिनीचे क्षेत्र ओलीताखाली येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६)** :(१) अ) जलसंपदा विभागांतर्गत सुरगाणा तालुक्यात एकही मध्यम प्रकल्प नसून बुंबळी ही एकमेव ल.पा.योजना अससून ही सन १९८५ मध्ये पुर्ण झालेली आहे.
आ) लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक या विभागांतर्गत सुरगाणा तालुक्यात मार्च, २०१६ पर्यंत ल.पा.अलंगूण ही एक योजना पूर्ण झालेली आहे.

(२) अ) सुरगाणा तालुक्यातील पुर्ण झालेल्या बुंबळी ल.पा. योजनेमुळे एकूण १३४ हे. क्षेत्र आज पर्यंत ओलिताखाली आले असून तेथील शेतकरी त्या पाण्यावर गहू, खोंडे, भुईमुंग, भाजीपाला इ. पिके घेत आहेत.
आ) ल.पा.अलंगुण या योजनेचे कालव्याचे काम शेतकरी अडथळ्यामुळे होऊ शकलेले नाही. कालव्याऐवजी धरणाचे खालील बाजूस साठवण बंधारे प्रस्तावित आहेत. सदर योजनेचे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र ११४ हे. आहे. तथापि वरील अडचणीमुळे सद्य:स्थितीत या योजनेवर सिंचन होत नाही.
(३) सुरगाणा तालुक्यातील सदर ३१ भविष्यकालिन योजनांपैकी २४ योजना जलसंपदा विभागांतर्गत असून ७ योजनांबाबत जलसंधारण विभागाकडून कार्यवाही अपेक्षित आहे.

जलसंपदा विभागाकडील २४ योजनांपैकी १) सतखांब २) सोनगीर ३) मालगोंदा ४) पिंपळसोंड ५) बाळओझर ६) वाघधोंड ७) उंबरविहिर ८) सालभोये ९) वांगण १०) अलंगुण-२, ११) हनुमंतमाळ ल.पा.यो. १२) वांगणपाडा १३) खडकमाळ ल.पा.योजना १४) बृहत ल.पा. दुमी (दुमीपाडा) या १४ योजनांचे सर्वेक्षण पुर्ण झालेले आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यास ५३.५५ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्माण होणार असून त्यामुळे ५३४५ हेक्टर जमिनीचे क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

जलसंपदा विभागाकडील २४ योजनांपैकी वरीलप्रमाणे सर्वेक्षण पूर्ण झालेल्या १४ योजनांव्यतिरिक्त (१) बोरीपाडा-१ (२) बोरीपाडा-२ (३) रगतविहिर (४) सुभाषनगर (५) थविलपाडा (६) सागपाडा (७) भितघर (८) बिजुरपाडा (९) चिचपाडा (१०) आमदा या १० योजनांचे सर्वेक्षण स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे हाती घेण्यात आलेले नाही.

या २४ योजनां व्यतिरिक्त उर्वरित ७ प्रकल्पांचे लाभक्षेत्र प्रत्येकी २५० हेक्टर पेक्षा कमी असल्यामुळे सदर योजनांबाबतची कार्यवाही जलसंधारण विभागामार्फत करणे अपेक्षित आहे.

---

## सुरगाणा व पेठ तालुक्यातील अरबी समुद्राला वाहून जाणारे पाणी नगर व मराठवाड्याला देण्याबाबत

**(१५) ५२५५८ (२५-०४-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरगाणा व पेठ तालुक्यातून पश्चिमेकडे अरबी समुद्राला वाहून जाणारे पाणी वळण योजनेद्वारे, नियमीत वीज वापरुन लिफ्ट करुन, बोगद्या द्वारे व लिफ्टसाठी सोलर वीजेचा वापर करुन गिरणा व गोदावरी खोऱ्यात वळविण्याची मागणी नाशिक, अहमदनगर व मराठवाड्यातील नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरगणा व पेठ तालुक्यातून पश्चिमेकडे जाणारे पाणी किती. टी.एम्.सी. आहे,
(३) असल्यास, सुरगाणा व पेठ तालुक्यातून पश्चिमेकडे अरबी समुद्राला वाहून जाणारे पाणी गिरणा व गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) याबाबतची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. तथापि दमणगंगा, नार, पार, अंबिका, औरंगा इत्यादी पश्चिम वाहीनी नदी खोऱ्यातील पाणी उपलब्धता विचारात घेवून पाण्याच्या नियोजनाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी शासनाने मुख्य अभियंता, नियोजना व जलविज्ञान नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे.

सदर समिती नमुद खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता कोकणातील स्थानिक पाण्याची गरज, यासाठी कोकणातील पुर्ण, बांधकामाधीन व भविष्यकाळातील प्रकल्प तसेच तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य गोदावरी व तापी खोऱ्यातील पूर्ण बांधकामाधीन व प्रस्तावित वळण योजनांचा अभ्यास करुन पाणी वापराचा बृहत आराखडा तयार करणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्हयातील जिल्हापरिषद शिक्षण विभागांतर्गत केल्या जाणाऱ्या शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या गत वर्षापासून प्रलंबीत असल्याबाबत

**(१६) ५२८४९ (२५-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील सुमारे १०० पेक्षा जास्त शिक्षकांनी पतीपत्नी एकत्रीकरण व कौटुंबिक अडचणीस्तव विनंती अर्जाव्दारे जिल्हापरिषद विभागांतर्गत व आंतरजिल्हा बदल्यांची केलेली मागणी गत वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांच्या बदल्या प्रलंबित असण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर जिल्हयातील शिक्षकांच्या बदल्या तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हा परिषद जालना अंतर्गत प्राथमिक शिक्षक संवर्गात रिक्त पदे उपलब्ध झाल्यानंतर आंतर जिल्हा बदली बाबतच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रवर्गनिहाय उपलब्ध रिक्त पदावर प्राधान्यक्रम व सेवाजेष्ठता विचारात घेवून प्राथमिक शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीने सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

## संगमेश्वर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत

**(१७) ५३०४३ (०६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात डोंगर उतारांवर होणारी मातीची धूप यामुळे मोठ्या प्रमाणात दगड व माती पावसाळ्यात नदीपात्रात साचत असून नद्या गाळाने भरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमेश्वर तालुक्यातील गडनदी, शास्त्रीनदी, सोनवी, असावी, अलकनंदा, काजळी, सप्तलिंगी, बावनदी तसेच चिपळूण तालुक्यातील वाशिष्ठी नदी आदी नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पावसाळ्यात पुराचे पाणी लगतच्या परिसरांमध्ये घुसून वारंवार पुराची समस्या निर्माण होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नद्यांमधील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६)** :(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) संगमेश्वर व चिपळूण तालुक्यातील ज्या नद्यांमध्ये गाळ साठल्यामुळे पाणी प्रवाहास अडचण येते, त्या नद्यांमधील गाळ काढण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडील यंत्रसामुग्रीमार्फत गाळ काढण्याचे काम करण्यात येते. सदर कामासाठी लागणारा निधी हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात येतो.

---

## वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील पोथरा प्रकल्प, उजवा कालवा, चिचघाट वितरिकेद्वारा पार्डी येथील शेतकऱ्यांना सिंचनाकरिता पाणी मिळण्याबाबत

**(१८) ५३०६८ (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील पोथरा प्रकल्प, उजवा कालवा, चिचघाट वितरिकेद्वारा पार्डी येथील शेतकऱ्यांना गेल्या २० वर्षापासून सिंचनाकरिता पाणी मिळालेले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, यासाठी पार्डी येथील शेतीला सिंचनाचे पाणी त्वरीत मिळावे, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अभियंता, पोथरा नाला प्रकल्प, उपविभाग, हिंगणघाट यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पार्डी येथील शेतीला सिंचनाचे पाणी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१६)** :(१) होय.
या आशयाचे निवेदन दि.१९.०४.२०१५ ला उपविभागीय अभियंता, मध्यम प्रकल्प उपविभाग, हिंगणघाट यांना प्राप्त झाले आहे.
(२) व (३) पोथरा प्रकल्प हा १९८३ साली पूर्ण झाला असून वितरण प्रणालीवरील बरीचशी बांधकामे नादुरुस्त झालेली आहेत. त्याचप्रमाणे वितरण प्रणालीवरील भरावाच्या कामाची झिज

झली आहे. सदरची कामे नियमित देखभाल दुरुस्तीच्या निधीतून करणे शक्य नसल्यामुळे सर्व आवश्यक बाबींचा अंतर्भाव असलेले अंदाजपत्रक तयार करुन वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यातील लाभक्षेत्राचा एकत्रित चतूर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रीक सल्लागार समितीस मंजुरीस्तव सादर केला आहे. सदर प्रस्तावात चिचघाट वितरीका वरील पार्डी लघू कालवा क्र. १, २, ३ व ४ ची कामे अंतर्भूत आहे. सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदरची कामे करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यात सिंचनासाठी शेतीला बंद पाईपलाईने पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१९) ५३६५६ (२९-०८-२०१६). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिंचनासाठी धरणातून कालव्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो त्यासाठी भूसंपादन करण्यात अडचणी व त्याचा वाढलेला खर्च विचारात घेता आता शेतीला बंद पाईपलाईनेच पाणी पुरवठा करण्याच्या धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याचे दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१९ पासून ऊस व अन्य बारमाही पिकांसाठी सुक्ष्म सिंचनप्रणाली बंधनकारक करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र राज्यासाठी नलिकाद्वारे सिंचन वितरण प्रणाली धोरणाच्या प्रस्तावास दिनांक १७.०५.२०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नलिकेद्वारे सिंचन वितरण धोरणाबाबत शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दिनांक २७.०१.२०१५ व दिनांक २५.०६.२०१५ च्या अधिसूचनेद्वारे टेंभू, भीमा, मुळा, निम्न मानार, हतनूर, उर्ध्व पूस, कान्होळी नाला व अंबोली अशा एकूण ८ पाटबंधारे प्रकल्पांवर उस, केळी, फळबागा इत्यादी बारमाही पिकांसाठी ठिबक व तुषार सिंचन पध्दतींचा जुन २०१८ पर्यंत अवलंब अनिवार्य करण्यात आला आहे.

वरील अनुभवाच्या आधारे हा निर्बंध राज्यातील अन्य प्रकल्पांवर बारमाही पिकांसाठी जुन २०१९ पासून लावण्यात येणार असल्याची बाब सदर अधिसूचनेत नमूद करण्यात आली आहे.

वरील अधिसूचनेनुसार बारमाही पिकांसाठी सुक्ष्मसिंचन पध्दतीचा अवलंब करण्याची यंत्रणा शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उभारणे अपेक्षित आहे.

(३) नलिकेद्वारे सिंचन वितरण धोरणाबाबतच्या दिनांक ०९.०६.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यासाठी नलिकाद्वारे सिंचन वितरण प्रणालीच्या जलदपणे व कार्यक्षम अंमलबजावणीसाठी सर्व पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांची दिनांक १३ जुलै, २०१६ रोजी वाल्मी, औरंगाबाद येथे एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली होती. सिंचन प्रकल्पांमध्ये नलिका वितरण प्रणाली जलदगतीने घेण्यासाठी दिनांक ०९.०६.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असल्याबाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. या शिफारशींनुसार दिनांक ०९.०६.२०१६ च्या धोरणात बदल करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिलारी धरण प्रकल्पाच्या कालव्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२०) ५३७९९ (२४-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गोवा या आंतरराज्य तिलारी धरण प्रकल्पाच्या कालव्यांच्या कामांची अंतिम मुदत संपून तब्बल सहा वर्ष होऊनही कालव्यांची कामे अपूर्ण असल्यामुळे बांद्यापासून मडुरा-सातोसेमधील शेतकऱ्यांचे जलसमृध्दीतून हरीतक्रांती करण्याच्या कामास विलंब लागणार असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नियोजनानुसार गोव्यातील क्षेत्र सिंचनाखाली आले असले तरी सिंधुदूर्गातील चार ते सव्वाचार हजार हेक्टर क्षेत्र कालव्यांची कामे अपूर्ण असल्यामुळे सिंचनाखाली आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार प्रकल्पाच्या कामास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

तिलारी प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा, डावा तीर कालवा व जोड कालवा (Link Canal) यांची कामे १०० टक्के पूर्ण झालेली असून बांदा शाखा कालव्याची कामे अंदाजे ६० टक्के पूर्ण झालेली ओहत. सद्यस्थितीत प्रकल्पावरील ६६७६ हे. सिंचन क्षेत्रा पैकी एकूण ५१७९ हे. सिंचन क्षेत्र निर्माण झालेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

बांदा शाखा कालव्यावरील ३९५७ हे. सिंचन क्षेत्रा पैकी २४६० हे. सिंचन क्षेत्र निर्माण झालेले असून उर्वरीत १४९७ हे. सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी कालव्याची अपूर्ण कामे प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने (PMKSY) मधून मार्च, २०१७ अखरे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामविकास विभागातंर्गत गावातील अंतर्गत रस्त्यांची बांधणी व दुरुस्ती निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ५३८७० (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागातंर्गत गावातील अंतर्गत रस्त्यांची बांधणी आणि जुन्या रस्त्यांची डागडुजी निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत व निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध निधी व कामाची निकड विचारात घेऊन शासनाकडे प्राप्त प्रस्तावांतील कामांना निधी मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत पुर्ण झालेल्या उत्तरमांड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२२) ५३९७३ (२४-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत उत्तरमांड धरणप्रकल्पाचे काम पुर्ण झाले आहे व सदर धरणाच्या डाव्या बाजूस मौजे माथणेवाडी हे गाव वसले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणात होणा-या पाणीसाठयामुळे या गांवातील सुमारे ४६ कुंटूबांना या पाण्याचा धोका निर्माण होत असल्याने या ४६ कुंटूबांचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याबाबत या कुंटूबीयांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ४६ कुंटूबाचे तातडीने पुनर्वसन करणे गरजेचा असल्याचा अहवाल सातारा पाटबंधारे विभागाकडे प्रलंबीत असून या गावातील बाधित ४६ कुंटूबीयांनी सात्तत्यांनी पाठपुरावा करूनही त्यांचे खास बाब म्हणून पुनर्वनसन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ४६ कुंटूबीयांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१६) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) दि. ०६/१२/२०१२ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी शासनाकडे (महसूल व वन विभागाकडे) ४६ कुटुबांचा खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. या दरम्यान दि. २९/०७/२०१५ रोजी मा.मंत्री, (मदत व पुनर्वसन) यांच्या समवेत बैठक झाली. सदर बैठकीत झालेलया चर्चेनुसार पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत उत्तरमांड धरणात पूर्ण संचय पातळीपर्यंत पाणीसाठा झाल्यानंतर प्रत्यक्षात बाधित होणाऱ्या घरांची पडताळणी करण्याची कार्यवाही जलसंपदा व महसूल विभागाकडून एकत्रितपणे करण्यात यावी. तद्नंतर शासनास फेरप्रस्ताव सादर करावा अशा सूचना मा.मंत्री महोदयांनी दिली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोकणातील ५६ सिंचन प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ५४०६९ (२४-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ५६ सिंचन प्रकल्प निधीअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी अत्यंत तुटपुंज्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील सिंचन प्रकल्पांना निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) कोकणातील ५५ प्रकल्प सद्य:स्थितीत बांधकामाधीन आहेत.
(२) व (३) बांधकामाधीन प्रकल्पांना शासनाच्या अर्थोपायाची स्थिती व राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येते.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळास एकूण रू. ४१३.४८ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गुहागर, चिपळूण आणि खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची दुरुवस्था झाल्याबाबत**

**(२४) ५४४३२ (२६-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मौजे कारूळ-पेवे-मादाली, मौजे रानवी-वेलदूर-धोपावे जेटी, मौजे तळी-कौढर काळसूर-झोंबडी, मौजे पाचेरी आगर-आंबेरे खुर्द, मौजे मासू-असोरे-आवरे-भातगाव, चिपळूण तालुक्यातील मौजे चिवेली-गोंधळे, मौजे मजरे कौढर-चिवेली-लोणारीबंदर, मौजे निव्हांळ-खरवते, मौजे ओमळी तसेच खेड तालुक्यातील मौजे कोतवली-मांडवकरवाडी, मौजे फुरूस-दयाळ, मौजे आयनी ढाकरवाडी-कारभारवाडी, मौजे शिव फाटा-आष्टी मोहल्ला, मौजे दयाळ जंगमवाडी, मौजे नांदगाव पाटीलवाडी जाकळवाडी येथील ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) होय.
(२) एकूण १५ रस्त्यापैकी ११ रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत मागणी पत्र जिल्हा परिषदेकडे प्राप्त आहेत.
(३) व (४) प्रश्नांकित १५ रस्त्यांपैकी कारुळ पेवे मादाली नदी ग्रामीण मार्ग क्र.२, वेलदूर नवानगर धोपावे रानवी ग्रामीण मार्ग क्र.१ व तळी कौढरकाळसूर झोंबडी देवघर ग्रामीण मार्ग क्र.२० या रस्तयांच्या दुरूस्तीची प्रत्येकी रु.२.२८ लक्षची कामे रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर आहेत.

वरील १५ रस्त्यांच्या उर्वरित खराब लांबीतील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.२०२२.१२ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्राथम्यक्रमानुसार सदर कामे टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**कणकवली, देवगड व वैभववाडी (जि.सिधुंदुर्ग) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२५) ५४४७७ (२६-०८-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली, देवगड व वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध होत नसल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असून नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत जिलहा परिषदेच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सन २०१५-१६ अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस २७८.२९ लक्ष इतका अतिरिक्त निधी देण्यात आलेला आहे.

रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम गट “अ” व “ब” अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये देवगड तालुक्यातील रु.४५.७४ लक्षच्या २२ कामांना व कणकवली तालुक्यातील रु.६१.४५ लक्षच्या ३१ कामांना तसेच वैभववाडी तालुक्यातील रु.२४.६० लक्षच्या १४ कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

---

**कोकण भवन, वांद्रे, पालघर, ठाणे, माझगांव येथील विक्रीकर विभागातील एकूण ६०० कंत्राटी लिपिक कामगारांना वेतन देण्याबाबत**

**(२६) ५४५७८ (२९-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रीवर विभागातील कोकणभवन, वांद्रे, पालघर, ठाणे, माझगाव येथील एकूण ६०० कंत्राटी लिपीक कामगारांना गेल्या दोन महिन्यापासून पगारच मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यास कामगार गेले असता त्यांना कामावरुन काढण्यात येईल अशी धमकी कंत्राटदाराकडून मिळत असल्याने या कंत्राटदारांवर विक्रीकर विभागाने कारवाई करावी अशी मागणी कंत्राटी लिपीक कामगारांनी केली आहे, हे ही खरे आह काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत व कंत्राटी कामगारांना तातडीने वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे. कंत्राटदाराने देयक कार्यालयास उशीरा सादर केल्याने पगार मिळण्यास विलंब झालेला आहे.
(२) हे खरे नाही.
विक्रीकर कार्यालयास अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) कंत्राटदाराला दिलेले काम दि.३१ जुलै, २०१६ पासून बंद करण्यात आले आहे. तसेच, मे.पेरीसॉफ्टवेअर सोल्युशन प्रा.लि. यांच्या देयकानुसार कंत्राटदारास रक्कम अदा करण्याची व तद्नंतर कामगारांचे वेतन देण्याबाबत कंत्राटदाराकडे पाठपुरावा करण्याची कार्यवाही विक्रीकर कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ३ लाख रुपये ऐवजी १० लाख रुपयांचे काम ई-टेंडरने करण्याबाबत

**(२७) ५४७६५ (२४-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कारभारात पारदर्शकता यावी यासाठी ३ लाख रुपये वा त्यापेक्षा जास्तीचे कोणतेही काम ई-टेंडरनेच करावे हा आदेश बदलून सदर मर्यादा किमान १० लाख रुपयांची करावी अशी मागणी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी केल्यानंतर मा. वित्त मंत्री यांनी अनुकूलता दर्शवून मा. मुख्यमंत्र्यांची अनुमती घेण्यात येईल अशी माहिती दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास एका बैठकीत देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयाच्या अंमलबजावणीस किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१६)** :(१) व (२) याबाबतचा शासन निर्णय क्र. स्थाविका - १११६/प्र.क्र.१४९/का.१४८२, दि. १२ जुलै, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रम आणि खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी ई-टेंडरींगची मर्यादा रु. ३ लक्ष वरुन रु. १० लक्ष वाढविण्यात आली आहे.

---

**विदर्भातील अनेक गावे बुडविणाऱ्या मेडीगटटा प्रकल्पास स्थगिती देण्याबाबत**

**(२८) ५४८७७ (२९-०८-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी लवादानुसार महाराष्ट्रातील गोदावरी व प्राणहिता नदीच्या पाण्यावर तेलंगणाचा हक्क आहे याचा आधार घेत कोणताही आराखडा नसंताना आणि दोन राज्याची सहमती नसंताना तसेच केंद्राची सुध्दा मान्यता नसतांना शेजारच्या तेलगंणा सरकारने राज्याच्या सीमावर्ती भाग असलेल्या गडचिरोली जिल्हयातील सिंरोचा येथील पोचमपल्ली गावाजवळ कालेश्वर मेडीगटटा (बॅरेज) धरणाच्या बांधकामाचे भुमीपूजन दिंनाक २ मे, २०१६ रोजी केले असल्याची माहिती दिनांक ५ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्राणहिता-चेविल्हा प्रकल्पाबाबतही सहमती नसताना या प्रकल्पाच्या कालव्यासाठी कोटयावधीचा खर्च केला जात असून या दोन्ही प्रकल्पामुळे गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्हयातील अनेक गावे पाण्याखाली जाण्याची भिती असूनही कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे तेलंगणाच्या विरोधात तेथील नागरिकांने निदर्शनेही केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तेलगंणा सरकारने हाती घेतलेल्या कालेश्वर मेडीगटटा (बॅरेज) धरणाच्या बांधकामाबाबत सिरोंचा येथील नागरिकांने या धरणाच्या निषेधार्त दिनांक २ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास पोचमपल्ली येथे अनेक लोकप्रतिनिंधीसह हजारो नागरिकांनी निषेध केला होता, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, आंतरराष्ट्रीय प्रकल्प सुरळीत मार्गी लागावेत यासाठी या दोन्ही राज्यांचे एक शिष्टमंडळ स्थापन झाले असून या मंडळाच्या केवळ दोन बैठका झाल्यात व त्यात केवळ प्रकल्पाच्या सर्वेक्षणाबाबत चर्चा झाली, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकल्पामुळे विदर्भातील अनेक गावे पाण्याखाली जाणार असल्यामुळे मेडीगटटा प्रकल्पास स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

दि.०८.०३.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मा.मुख्यमंत्री तेलंगणा यांच्यात मुंबई येथे झालेल्या बैठकीत दोन्ही राज्याचे सर्व आंतरराज्यीय प्रकल्प राबविण्याबाबत नियंत्रण मंडळ स्थापनेविषयी नव्याने करार झाला. आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून दोन्ही राज्याच्या संमतीने सर्व आंतरराज्यीय प्रकल्पाचे निर्णय घेण्यात येणार आहेत.

तेलंगणा राज्याने केंद्र व राज्यशासनाकडून आवश्यक वैधानिक मान्यता घ्याव्यात असा निर्णय नियंत्रण मंडळाच्या दि.२३.८.२०१६ चे बैठकीत झाला आहे.

मेडीगड्डा बॅरेज व उसियो चे भूमीपूजन तेलंगणा राज्यातर्फे दि.०२.०५.२०१६ रोजी करण्यात आले आहे. तथापि, अद्याप कामास सुरूवात झाली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

तुमडीहेटी बॅरेजचे कालव्याचे काम तेलंगणा हद्दीत सुरू आहे. या कामावरील खर्चाची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध नाही.

तुमडीहेटी बॅरेज व मेडीगड्डा बॅरेजमुळे कोणतेही गावठाण बुडीत होत नाही. तथापि काही शेतजमीन बाधीत होणार आहे. संयुक्त सर्वेक्षणाच्या वेळी गावकऱ्यांनी निर्देशने केली होती, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे. दि.०८.०३.२०१६ रोजी महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील आंतरराज्य सिंचन प्रकल्पाबाबतचे सर्व निर्णय घेण्यासाठी आंतरराज्यीय नियंत्रण मंडळ स्थापन झाले आहे. तसेच स्थायी समिती व प्रकल्पाकरिता समन्वय समितीही स्थापन झालेली आहे.

आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाची पहिली बैठक दि.२३.०८.२०१६ रोजी मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये बॅरेजचे बांधकामासाठी सर्व वैधानिक मान्यता घेणे, भुसंपादन, पूरसंरक्षक बंधारे इ. विषयाबाबत चर्चा झाली.

(५) तुमडीहेटी बॅरेज व मेडीगड्डा बॅरेजमुळे एकही गावठाण बुडीत होत नाही. तसेच या प्रकल्पाबद्दल सर्व निर्णय आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून व दोन्ही राज्याच्या हिताच्या दृष्टिने घेण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पास स्थगिती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील लघुमध्यम व मोठे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

**(२९) ५४९०२ (२९-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लघुमध्यम व मोठे असे एकुण ३८० अपूर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांची कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे ८९,००० कोटी रुपयांची मागणी केलेली असून

यासंदर्भात दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री यांचेसमवेत मा.केंद्रीय मंत्री महोदयांची बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच विदर्भातील ६ व मराठवाडयातील ८ जिल्हयातील १३२ सिंचन प्रकल्पांना ७१८७ कोटी व पश्चिम महाराष्ट्र व अन्य भागातील ७४ दुष्काळी तालुक्यांसाठी केंद्र सरकारच्या वतीने २ हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय माहे मे,२०१६ च्या पहिल्या सप्ताहात शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकल्प तीन वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रु.९१८७ कोटीची मदत शासनास केंद्राकडून प्राप्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
राज्यातील केंद्रीय अर्थसहाय्यीत २६ मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मा.सुश्री उमा भारतीजी, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा.श्री.नितीन गडकरीजी केंद्रीय रस्ते, महामार्ग वाहतूक मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे दि.३.५.२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.मंत्री (अर्थ) मा.मंत्री (जलसंपदा), मा राज्यमंत्री (जलसंपदा) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.
(२) सदर बैठकीत राज्याकडून केंद्र शासनाकडे पॅकेज स्वरुपात निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करणेत आली आहे. आत्महत्याग्रस्त विदर्भातील ६ व मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील एकूण १०७ प्रकल्पांना रु.७१८७ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करणेत आली आहे. तसेच उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण ग्रस्त भागातील ७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु.३५०० कोटी इतक्या निधीची मागणी करणेत आली आहे.
(३) केंद्र शासनाने रु.१०,६८७ कोटी निधी स्वरुपात ३ वर्षात उपलब्ध करुन द्यावा व त्यातून आत्महत्याग्रस्त भागातील १०८ प्रकल्प ३ वर्षात पूर्ण होऊ शकतील असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्र्यांच्या निदर्शनास आणले आहे.
(४) रु. १०,६८७ कोटी एवढा निधी पॅकेज स्वरुपात देण्यात यावा असा सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. या प्रस्तावाच्या पाठपुराव्यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांनी मा.पंतप्रधान व मा.जलसंसाधन मंत्री यांना पत्रे दिली आहेत. तसेच केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन प्रत्यक्ष पाठपुरावा केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गावांचा विकास आराखडा तयार करुन त्यानुसार गावांचा विकास करण्याबाबत**

**(३०) ५४९६९ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका व नगरपरिषदांच्या धर्तीवर राज्यातील ग्रामपंचायतीचाही विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचा निर्णय मा.ग्रामविकास मंत्री यांनी नुकताच जाहीर केला असून तयार झालेल्या आराखडयांना दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास एकाच दिवशी २८ हजार ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा घेऊन मंजूरी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडे तयार करण्यासाठी अडचण येऊ नये म्हणून ८ हजार प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात येणार असून त्या प्रतिनिधींमार्फत ग्रामपंचायत सदस्यांपासून ते जिल्हा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांपर्यंत ६ लाख लोकांना प्रशिक्षण देणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आराखडा तयार करण्यासाठी ८ हजार प्रतिनिधींना व त्या प्रतिनिधींकडून ग्रामपंचायत सदस्यांपासून जि.प.च्या मुख्य अधिकाऱ्यांपर्यंत ६ लाख लोकांना केव्हा पासून व किती कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) होय,

सदर आराखडे महानगरपालिका व नगरपरिषदांच्या धर्तीवर असतील असे नाही.

ग्रामविकास आराखडयांना दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा घेऊन मंजूरी देण्याचे नियोजित केले होते.

(२) होय, आमचं गाव आमचा विकास या कार्यक्रमांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदेच्या अधिकारी व पदाधिकारी यांना राज्यस्तर प्रमुख प्रशिक्षकामार्फत माहे जून व जूलै, २०१६ दरम्यान जिल्हा स्तरावर आणि आठ हजार प्रतिनिधींमार्फत ग्रामपंचायत सदस्यांना आणि ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांना ऑगस्ट, २०१६ दरम्यान प्रशिक्षण नियोजित करण्यात आले होते.

(३) ग्राम स्तरावर ३ दिवसांच्या लोक सहभागी प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले होते. तसेच प्रशिक्षण घेतलेल्या ८ हजार प्रतिनिधीमार्फत ग्राम पंचायत सदस्यांना आणि ग्राम पंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण माहे ऑगस्ट, २०१६ नियोजित करण्यात आले होते.

---

## बुलढाणा जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतंर्गत जॉबकार्ड वितरित केलेल्या कामगारांना कामे मिळण्याबाबत

**(३१) ५५०६७ (२९-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतंर्गत जॉबकार्ड वितरित केलेल्या कामगारांना कामे मिळत नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जिल्ह्यात जॉबकार्ड धारक मजूरांकडून कामाची मागणी प्राप्त झाल्यानंतर त्यांना कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र सरकारच्या मुद्रा बँक योजनेच्या प्रस्तावाबाबत**

**(३२) ५५०७६ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या मुद्रा बँक योजनेचा राज्यातील जास्तीत जास्त तरुणांना, व्यवसाय सुरु करुन, उद्योजक करणेबाबतचा लाभ मिळावा यासाठी सदरहू योजनेचा प्रसार ग्रामीण भागातील गावोगावी दुर्गम भागात करण्यासाठी शासनाने जिल्हा पातळीवर, जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली, ११ सदस्यांची समिती स्थापन करण्यास दिनांक २४ मे,२०१६ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मुद्रा बँक योजनेचे स्वरुप व निकष काय आहेत तसेच ही योजना जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे कार्य व अधिकार काय आहेत,

(३) असल्यास, माहे जुन २०१६ अखेरपर्यंत राज्यातील किती तरुणांनी मुद्रा बँक योजनेचा लाभ घेण्यासाठी, संबंधित स्थापन केलेली समिती अथवा बँकांकडे प्रस्ताव सादर केले आहेत, त्यापैकी किती प्रस्तावांना मंजूरी देवून प्रत्यक्षात निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(४) तसेच सदरहू योजनेच्या लाभ धारकांची जिल्हानिहाय संख्या काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :**(१) होय.

नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र.एसएलबीसी-१६१६/प्र.क्र.४९/का.१४१७, दिनांक १४.६.२०१६ अन्वये मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीत जास्त तरुणांना मिळावा यासाठी या योजनेचा प्रचार, प्रसार व समन्वय करण्याकरिता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणे या नवीन योजनेस मान्यता देण्यात आली आहे.

(२) उपरोक्त नमूद दिनांक १४.६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत मुद्रा बँक योजनेचा प्रचार, प्रसार व समन्वय करण्यात येणार आहे.

(३) व (४) बाबत नमूद करण्यात येते की, राज्यस्तरीय बँकर्स समितीकडून प्राप्त माहिती सचिवांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

---

**दमनगंगा-पिंजाळ या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाच्या सामजंस्य करारास केंद्र शासनाकडून अद्याप मंजुरी न मिळाल्याबाबत**

**(३३) ५५१२२ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमनगंगा-पिंजाळ या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाच्या सामजंस्य करारास केंद्रीय जलसंसाधन मंत्रालय व राष्ट्रीय जलविकास अभिकरणास राज्य शासनाकडून अहवाल प्राप्त झाला असतांनाही सदर प्रस्तावाच्या सामजंस्य करारास केंद्र शासनाकडून मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या सामजंस्य करारास विनाविलंब मंजूरी घेणे तसेच सदर राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प घोषित करणेबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठ पूरावा करुन कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) होय.

दिनांक ०३.०५.२०१० रोजी दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या आंतरराज्य नदीजोड योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठीचा सामंजस्य करार मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र व मा.मुख्यमंत्री, गुजरात यांच्यात झाला आहे व त्यानुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने मार्च, २०१४ मध्ये दमणगंगा-पिंजाळ या आंतरराज्य नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन महाराष्ट्र शासनास सादर केला आहे.

सामंजस्य करारास केंद्र शासनाकडून मंजूरी घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) दमणगंगा-पिंजाळ हा नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करावा याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी सप्टेंबर, २०११ मध्ये केंद्र शासनाकडे त्याचप्रमाणे मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दिनांक १४.०५.२०१५, दिनांक १३.०७.२०१५ व दिनांक १५.०९.२०१५ रोजीच्या नदीजोड प्रकल्पांच्या विशेष समितीच्या बैठकीत राज्य शासनातर्फे मागणी केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १८९ सिंचन प्रकल्पाच्या चौकशी अहवालाबाबत**

**(३४) ५५१२६ (२६-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील १८९ सिंचन प्रकल्पाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीत तीन महिने इतका कालावधी होवूनही अद्याप शासनास चौकशी अहवाल सादर केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशी अहवाल सादर करण्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनास चौकशी अहवाल सादर केला असल्यास, त्याद्वारे करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर शिफारशींनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) शासनाने निर्धारित केलेल्या अंतिम मुदतीपूर्वी म्हणजेच दिनांक ०९.०८.२०१६ पूर्वी चौकशी समितीने अवाल सादर केला आहे.
(२) निर्धारित कालावधीत अहवाल सादर करण्यात आल्याने विलंबनाचा प्रश्नच उद्भवत नाही.
(३) व (४) चौकशीसाठी सुनिश्चित केलेल्या ५ मुद्यांचा समावेश असलेल्या कार्यकक्षेस अनुसरुन समितीने कार्यकक्षनिहाय अभिप्राय व निष्कर्ष चौकशी अहवालात नमूद केले आहेत. यापैकी प्रमुख निष्कर्षाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१. निविदा मागविण्याच्या प्रक्रियेतील अनियमितता १०३ प्रकल्पांमध्ये घडल्याचे दिसून येते.
२. १६ प्रकल्पकामांबाबत कार्यारंभ आदेश दिल्यानंतर व काम सुरु झालेले नसतांना तसेच निविदेत तरतूद नसतांना अग्रिम रक्कम अदा करण्यात आल्याचे दिसून येते.
३. एकात्मिक राज्य जल आराखड्याअभावी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून MWRRA Act-२००५ मधील संबंधित अनुच्छेद ११(F) मधील संपूर्ण तरतुदींचे पुर्णत: पालन झाल्याचे दिसून येत नसल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने प्रकल्पांना दिलेल्या सर्व मान्यता MWRRA Act-२००५ च्या कार्यकक्षेबाहेरील आहेत, असे निदर्शनास येते.

(५) विलंब झालेला नसल्याने कारणे नमूद करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

### रेणापूर (जि.लातूर) येथील रेणा नदीवरील बॅरेजेसची कामे निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३५) ५५२२७ (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) येथील रेणा नदीवरील खरोळा व घनसरगाव येथील बॅरेजेसच्या कामासाठी गेल्या दोन वर्षापासून निधी तरतूद नसल्याने अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामासाठी निधीची तरतूद करून कामे पूर्ण करण्याबाबत लोकप्रतीनिधिनी माहे मार्च २०१६ मध्ये व दिनांक ४ जून,२०१६ रोजी मा.जलसंपदा मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बॅरेजेसची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) प्रकल्प भौतिकदृष्टया पूर्ण असून अवशिष्ट कामे या शिर्षाखालील तरतुदीतून बॅरेजेसची किरकोळ शिल्लक कामे करण्यात येत आहे.
(२) होय.
(३) अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येवून अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट भागातील गावांमध्ये समुद्राचे उधाणाचे पाणी शिरुन जमीन नापीक होत असल्याबाबत

**(३६) ५५२३९ (२९-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट भागातील मानकुले, बहिराचापाडा, नारंगीचा टेप व परिसरातील गावामध्ये अनेक वर्षापासून समुद्राच्या उधाणाचे पाणी शिरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारेपाटातील मानकुले, बहिरीचापाडा, नारंगीचा टेप या गावात दि.८ व ९ एप्रिल २०१६ वा त्यासुमारास समुद्राचे उधाणाचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून पीकत्या भात शेत जमिनीमध्ये खारे पाणी शिरल्याने जमिनी क्षारयुक्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधबंदिस्तीबाबत खारभूमी विभागाच्या जाचक अटी व शर्ती असल्याने बंधारे बांधण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बांधबंदिस्तीबाबत खारभूमी विभागाच्या जाचक अटी व शर्ती शिथिल करण्यासाठी व सदर गावात बांधबंधिस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१६) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

खाऱ्या पाण्यामुळे जमिनी क्षारयुक्त झाल्या आहेत, तथापि जनजीवन विस्कळीत झालेले नाही.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

मानकुले व बहिरीचापाडा ही गोव मानकुले या शासकीय खारभूमी योजनेमध्ये समाविष्ट आहेत. मानकुले ही योजना मोठ्या प्रमाणावर कमकुवत झाली आहे. योजनेच्या संपूर्ण नुतनीकरणाचे अंदाजपत्रक मापदंडात बसत नसल्यामुळे, मंजूर होऊन शकले नव्हते.

आता खारभूमी योजनांसाठी सुधारीत मापदंड मंजूर झाला असून, मानकुले या शासकीय खारभूमी योजनेचे संपूर्ण नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

नारंगीचा टेप या गावाचा समावेश मांडवखार-रांजणखार या खाजगी खारभूमी योजना असल्यामुळे सदर योजनांचे काम शासनामार्फत हाती घेणे शक्य झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंटुर सर्कल (ता.नायगाव, जि.नांदेड) परिसरात जिल्हा परिषदेतंर्गत करण्यात आलेली विविध कामे बनावट व निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(३७) ५५२५२ (२४-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंटुर जि.प.सर्कल (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषदेअंतर्गत मेळगाव ते धनज, रुई ते कुंटुर कारखाना, इज्जतगाव ते रुई आणि कुंटुर ते सावरखेड रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता परंतु सदरील निधीचा जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी विनीयोग न करता बनावट कामे करुन देयके घेतली असल्यामुळे कामे प्रलंबित असल्याची बाब माहे जून, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रस्त्यांच्या कामात अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे व संगनमताने कामे निकृष्ट झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्यांच्या निधीचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. प्रश्नांकित रस्त्यांची कामे मुदतीच्या आत पूर्ण करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर कामे सुस्थितीत असून वापरात आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील साई उच्च पातळी बंधारा यासाठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला प्रलंबित असल्याबाबत

**(३८) ५५२५५ (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील साई उच्च पातळी बंधाऱ्यासाठी मौजे महापूर, साई, नांदगाव, नागझरी, आरजखेडा, इंदरठाणा या गावातील शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना शासनाने दिलेला नसल्यामुळे सदर शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतीनिधिनी दिनांक ४ जून,२०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे झालेल्या आढावा बैठकीत निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) मा.विधानसभा सदस्य यांचे दि.०२/०६/२०१६ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) लातूर जिल्ह्यातील साई उच्च पातळी बंधाऱ्यासाठी मौजे महापूर, साई, नांदगाव, नागझरी, आरजखेडा, इंदरठाणा या गावातील शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा अंतिम मावेजा रु. ४१.१० कोटी मंजूर झाला असून, त्यापैकी रु. ६.३७ कोटी भूसंपादन अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आले आहेत. जमा करण्यात आलेल्या रकमेपैकी मौजे-आरजखेडा व इंदरठाणा येथील जमिनीचा मोबदला रु. १.२७ कोटी वाटप करण्यात आला असून उर्वरीत मौजे-महापूर, साई, नांदगांव, नागझरी या गावांचा मोबदला रु. ३४.७४ कोटी निधी अभावी प्रलंबित आहे. सदर प्रकल्पास सन २०१६-१७ या चालू आर्थिक वर्षात मंजूर तरतूद रुपये १००.०० लक्ष असून त्यानुषंगाने प्राप्त निधी रु. १००.०० लक्ष हा भूसंपादन मावेजा प्रकरणी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा (जि.बुलढाणा) मासरुळ धरणाच्या सांडव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३९) ५५३२१ (२०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) मासरुळ धरणाच्या वाढीव क्षेत्रासाठी जमिनी अधिग्रहीत कराव्या व धरणाची उंची वाढविण्यासाठी अपूर्ण असलेले सांडव्याचे काम पूर्ण करुन धरणातील पाण्याचे क्षेत्र वाढवावे व याचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचेकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६)** :(१) होय.
(२) धरणाच्या उंचीवाढीचा प्रस्ताव अंतर्भूत करून सुधारीत अहवाल तयार करणेत आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्हा परिषदेचे काही शिक्षक व अन्य कर्मचारी वारंवार वैद्यकीय देयके सादर करुन फसवणूक करत असल्याबाबत

**(४०) ५५३९८ (१०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हा परिषदेचे काही शिक्षक व अन्य कर्मचारी वारंवार वैद्यकीय देयक सादर करुन शासनाची फसवणूक करीत असल्याने त्यांच्यावर पायबंद घालण्यासाठी गत पाच वर्षातील वैद्यकीय देयकांची चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६)** :(१), (२), (३) व (४) जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत प्रत्येक विभागात शिक्षक व अन्य कर्मचारी यांनी सादर केलेली वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके प्रचलीत पध्दतीनुसार जिलहा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी यांची तांत्रिक मंजूरी घेवून ज्याप्रमाणे सादर करतील त्या प्रमाणे आवश्यक ती तपासणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक अदा करण्यात येत होती. या संचिका सादर करण्यापूर्वी कर्मचाऱ्याने किती वेळा वैद्यकीय देयकांची मागणी केलेली आहे. याबाबत कोणतीही माहिती सादर केली जात नव्हती. त्यामुळे दि. ७.१.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम यांनी संबंधित विभाग प्रमुखांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयका संदर्भात आढावा बैठक घेतली. त्यात सर्व विभाग प्रमुखांनी आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके सादर करतांना मागील ३ वर्षात त्यांनी घेतलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या बिलांची माहिती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या

आहेत. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाची स्वतंत्र नस्ती तयार करण्यात येत आहे. यामुळे वारंवार देयकांची मागणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत आवश्यकतेनुसार सखोल तपासणी करता येईल. त्याप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सर्व खाते प्रमुखांना सूचना दिलेल्या आहेत.

---

## संग्रामपूर व तेल्हारा (जि.अकोला) येथील लाभधारक शेतकऱ्यांसाठी ११९ कुपनलिकेवर खर्च करुनही शेतकऱ्यांना लाभ मिळत नसल्याबाबत

**(४१) ५५४११ (२०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर व तेल्हारा (जि.अकोला) येथील लाभधारक शेतकऱ्यांसाठी ११९ कुपनलिकेवर ४ कोटी रुपये खर्च करुनही शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्यामुळे शेतकरी सिंचनाच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शेतकऱ्यांना सिंचनासाठी कुपनलिकेचा लाभ मिळण्याबाबत व लाभ देण्यास विलंब लावणाऱ्या संबधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

वान प्रकल्पाच्या (ता.तेल्हारा) लाभक्षेत्रात प्रकल्पाचा भाग म्हणून एकूण ११९ कूपनलींकांद्वारे २१६८ हे. सिंचन क्षेत्र निर्मिती ची कामे सन २००८ ते २०१२ मध्ये पूर्ण झाली असून त्यावर एकूण रु. १२.०१ कोटी (स्थापत्य कामे+विद्युत कामे) खर्च झालेला आहे.

या प्रकल्पाच्या संपूर्ण लाभक्षेत्रात ६२ पाणीवापर संस्था स्थापन झालेल्या असून संपूर्ण लाभक्षेत्र पाणीवापर संस्थेस व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत झालेले आहे.

सध्या एकूण ११९ कुपनलिकांपैकी ७९ कुपनलिकांवरील विद्युत रोहीत्रांची चोरी झाली असून त्यामुळे त्याठिकाणी सिंचनास अडचण निर्माण झाली आहे.

(२) व (३) याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीने हिवरखेड पोलीस स्टेशन ता.तेल्हारा, जि.अकोला येथे प्राथमिक अन्वेषण अहवाल (FIR) दाखल केले आहे.

सदर चोरीस गेलेले रोहीत्र पुनश्च उभारणी करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे पाठपुरावा चालु आहे. त्यांचे मार्फत रोहीत्र बसविण्याची कामे प्रगतित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील इरई नदी पुनजिर्वनाच्या कामात**
**झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४२) ५५४८८ (२६-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील इरई नदीचे पुर्णजिर्वनाचे काम करण्यासाठी राज्य शासनाने अंदाजे १३० कोटी रूपये मंजूर करण्यात आले, सिंचाई विभागाच्या तांत्रिक विभागाकडून या कामास मशिनव्दारे सुरू करण्यात आले असून मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याची माहिती दिनांक ५ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोडो रूपये खर्च करून इरई नदीचे पुर्नजिर्वनाचे काम मशिनव्दारे करण्यात येत असून माती व कचरा काढण्याचे काम सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी उच्चस्तरिय अधिकाऱ्यांने करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) नाही.

सदरचे काम खाजगी ठेकेदारामार्फत केलेले नसून शासनाच्या यांत्रिकी विभागाच्या यंत्रसामुग्रीद्वारे केलेले आहे.

(२), (३), (४) व (५)

प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील वाघोली बुटी उपसा सिंचन योजनेतील**
**प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४३) ५५४९० (२६-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) तालूक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या हजारो एकर शेती वाघोली बुटी उपसा सिंचन प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आलेले असतांना सुध्दा या सर्व शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला मिळालेला नसल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघोली बुटी उपसा सिंचन प्रकल्पात एकूण किती जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत व त्यापैकी संपादीत केलेल्या किती जमिनीचा मोबदला देण्यात आलेला आहे

(३) असल्यास, वाघोली बुटी उपसा सिंचन प्रकल्पात संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला व वाढीव मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) वाघोली बुटी योजनेकरीता एकूण ७४.०७ हे. खाजगी जमीन संपादीत करण्यात आलेली असून त्यापैकी ६३.०९ हे. जमीनीचा मोबदला संबंधितांना देण्यात आलेला आहे.

(३) जिल्हाधिकारी, चंद्रपूर ह्यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय मुल्यनिर्धारण समितीने निर्धारीत केलेल्या दरानुसार उर्वरित १०.९८ हे. खाजगी संपादित जमिनीचा मोबदला सरळ खरेदीने देण्याची कार्यवाही सुरु आहे.

वाघोली बुटी उपसा सिंचन प्रकल्पात जमीन संपादीत करण्यात आलेल्या शेतकऱ्यांनी वाढीव मोबदल्याबाबत मागणी नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील लोढोंली उपसा सिंचन योजनेस मंजूरी मिळण्याबाबत

**(४४) ५५४९१ (२६-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोंढोली (ता.सावली, जि.चंद्रपूर) परिसरातील हजारो एकर शेतीचे सिंचन करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या लोढोंली उपसा सिंचन योजनेचे प्रस्ताव सि.डी.ओ.नाशिक यांचेकडे मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्याची माहिती दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपसा सिचंन योजनेचा समावेश वैनंगगा नदीवर बांधण्यात येत असलेल्या चिचडोह प्रकल्पाचा (बंधारा) भाग असुन या प्रकल्पाचे बांधकाम ८० टक्के पुर्ण झालेले असंताना सुध्दा लोंढोली उपसा सिंचन योजनेस अद्यापही मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोंढोली परिसरातील हजारो एकर सिंचन क्षमता असलेल्या लोंढोली उपसा सिंचन योजनेचे बांधकाम किती कालावधीमध्ये पुर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, लोंढोली उपसा सिचंन योजनेस तातडीने मंजूरी मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-११-२०१६)** :(१) नाही. लोंढोली योजनेची पंपीग मशिनरीची परीगणके दि.२७.०२.२०१५ च्या उपसमितीच्या बैठकीत निश्चित झाली असून या परिगणकांना स्थायी समितीच्या दि.२२.०४.२०१५ च्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. या वर्षीच्या मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक चे संकल्पन कार्यक्रमात या योजनेचा समावेश आहे. योजनेच्या सर्वसाधारण आराखड्याकरिता आवश्यक माहिती अन्वेषण मंडळाने दि.०३.०६.२०१६ ला मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिकला पुरविली आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिककडून योजनेचा सर्वसाधारण आराखडा करण्याचे काम प्रगतीत आहे.

(२) होय, लोढोंली उसियो चा सविस्तर प्रकल्प अहवाल अद्याप प्रशासकीय मंजूरीस्तव सादर झाला नाही.

(३) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून योजनेच्या सर्वसाधारण आराखड्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे योजनेचा प्रकल्प अहवाल तयार होऊन राज्य तांत्रीक सल्लागार समिती, नाशिक यांना तपासणीस्तव सादर होईल व त्यानंतर अहवाल शासनास प्रशासकीय मान्यतेसतव सादर होईल. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ३.१६ हे वनजमिनीचे प्रस्ताव तयार करुन प्रस्तावास केंन्द्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची मंजूरी प्राप्त झाल्यावर बांधकाम कार्यक्रमानुसार निधी उपलब्ध झाल्यास योजनेचे काम ४ वर्षात पूर्ण करण्यात येईल.

(४) सद्य:स्थितीत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून योजनेचा सर्व साधारण आराखडा करण्याचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रभागा नदी भीमाशंकरच्या उगमापासून संगमापर्यंत वाहण्यासाठी प्राधिकरण स्थापना करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४५) ६३३०० (२०-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा नदी भीमाशंकरच्या उगमापासून संगमापर्यंत वाहण्यासाठी चंद्रभागेचे जूने स्वरुप व वैभव प्राप्त करुन देण्यासाठी प्राधिकरण स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधींन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाच्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील शिक्षिकेला शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४६) ६३६४१ (१८-०८-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात मुख्यमंत्री यांच्या गाडीखाली माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जीव देण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिक्षिकेस नोकरी देण्याचे मा.मुख्यमंत्री यांनी आदेश देवूनही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प सोलापूर यांनी सदर शिक्षिकेला माहे मार्च, २०१६ च्या अखेर शासकिय सेवेत सामावून घेतले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर शिक्षिकेस शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) मा.मुख्यमंत्री यांच्या दिनांक ६-९-२०१५ रोजीच्या सोलापूर भेटीच्या वेळी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर वाहनताफ्याच्या समोर आत्महत्येचा प्रयत्न केलेला होता. परंतु त्यांना पुन्हा जिल्हा परिषद सेवेत सामावून घेणेबाबत मा.मुख्यमंत्री यांचेकडून कोणतेही आदेश जिल्हा परिषदेस प्राप्त झालेले नाहीत.
(२), (३) व (४) श्रीमती भारती सायबण्णा कोळी यांचे जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या दिनांक २५-५-२००९ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून कमी करण्यात आलेले आहे. तथापि अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेणेबाबत सद्य:स्थितीत सामान्य प्रशासन विभागाकडून कोणतेही धोरण निश्चित करण्यात आलेले नाही. त्याअनुषंगाने श्रीमती भारती सायबण्णा कोळी, तत्कालीन उपशिक्षिका यांना अद्याप जिल्हा परिषद सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही.

---

### इरई धरणाच्या बॅकवॉटरमुळे चंद्रपूर शहराला धोका निर्माण झाल्याबाबत

**(४७) ६३६५७ (१८-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ८६ पूर प्रवण गावे असून सन २०१३ मध्ये चंद्रपूर शहरासह तब्बल ३५ गावांना पुरामुळे प्रचंड नुकसान सहन करावे लागले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी उपाययोजना करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर शहराला इरई धरणाच्या बॅकवॉटरमुळे निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१०-२०१६) :**(१) होय.
(२) पूरप्रवण गावाच्या निळी रेषा व लाल रेषा आखणीचे सर्वेक्षण करुन त्या अनुषंगाने पुढील उपाययोजना करण्याकरीता संकल्पन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
(३) चंद्रपूर शहराला इरई धरणाच्या बँकवॉटरमुळे निर्माण होणारा धोका टळण्यासाठी, इरई नदीचे ३० कि.मी. लांबीचे गाळाचे सर्वेक्षण करुन गाळ काढण्याचे काम करण्यात येत आहे. तसेच आवश्यक ठिकाणी संरक्षक भिंत बांधणे, इरई नदीचे पाणलोट क्षेत्रात चेक डॅम व गॅबीयन बंधाऱ्याचे बांधकाम करणे, तसेच इरई नदीमध्ये ठिकठिकाणी ९ बंधाऱ्याची कामे, इत्यादी कामे प्रस्तावीत करण्याबाबत नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी असलेल्या प्रकल्पाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्याबाबत

**(४८) ६३६७४ (११-०८-२०१६). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी महत्वाचे असलेले आसोलामेंढा, घोडाझरी, नलेश्वर, चंदई, चारगाव, अंमलनाला, लभानसराड, पकडीगुड्डम, डोंगरगाव, दिना व इरई या प्रकल्पात माहे मे २०१६ च्या पहिल्या आठड्यात इरई वगळता उपरोक्त १० सिंचन प्रकल्पात २० टक्के पेक्षाही कमी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांपैकी चंदई, लभानसराड आणि दिना सिचंन प्रकल्प पुर्णत: कोरडे पडले असून नलेश्वर, घोडाझरी, चारगाव व अमलनाला हे ही प्रकल्प कोरडे होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील उक्त ११ सिंचन प्रकल्पाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६)** :(१) होय.

(२) होय.

(३) शासनाकडून चौकशी करण्यात आली नाही, परंतु मे, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात दि. ५/५/२०१६ ला चंदई, लभानसराड, नलेश्वर, चारगाव व दिना प्रकल्पात उपयुक्त पाणीसाठा निरंक होता, घोराझरी व अमलनाला प्रकल्पात अनुक्रमे ७.९६%, ८.८६% उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता. ही वस्तुस्थिती होती. मागील वर्षी पर्जन्यमान कमी झाल्यामुळे कमाल पाणीसाठा आलोसामेंढा धरणात ४५%, घोडाझरी धरणात ६९% व नलेश्वर धरणात ६५% झालेला होता व इतर प्रकल्पात १००% पाणीसाठा झालेला होता. सदर प्रकल्प मुख्यत्वे खरिप व रब्बी चे सिंचना करिता असल्यामुळे पिण्याचे पाण्याचे मंजूरी असलेले पाणी आरक्षण ठेवून सिंचना करिता पाणी पुरविण्यात आले.

(४) घोराझरी, नलेश्वर, अमलनाला, दिना व ईरइ या प्रकल्पाच्या सांडव्याची किंवा गेटची उंची वाढवून पाणी साठवण क्षमता या आधीच वाढविलेली आहे. तसेच आसोलामेंढा प्रकल्पाची व पकडीगुड्डम प्रकल्पाच्या सांडव्याची उंची वाढवून पाणी साठवण क्षमता वाढविण्याचे काम प्रस्तावित आहे. पकडीगुड्डम प्रकलपाचे उंची वाढविण्याकरिता १९.७० हे. वनजमीन आवश्यक असून त्यास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त करण्यास्तव वन प्रसताव मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

### वाडा (जि.पालघर) तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, गारगांव या आदिवासी भागातील आश्रमशाळेच्या नविन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४९) ६९५४० (११-११-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, गारगांव या आदिवासी भागातील आश्रमशाळेच्या नविन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळेच्या इमारतीच्या बांधकामास दोन वर्षापूर्वी सुरुवात होऊनही अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या जाणीवपूर्वक केलेल्या विलंबामुळे परिसरातील आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थिनी ह्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गारगांव आदिवासी आश्रमशाळेचे बांधकांम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर व याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामाच्या विविध बाबींच्या चाचण्या नियमानुसार घेण्यात आल्या असून त्या निकषांप्रमाणे योग्य असून कामाचा दर्जा गुणवत्तेनुसार असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) सुरुवातीस जमीन मालकाने इमारतीच्या बांधकामास हरकत घेतल्याने तसेच जवळपास एक वर्ष वाळूच्या उपलब्धते अभावी इमारतीचे बांधकाम खंडीत झाले होते, त्यामुळे बांधकामास विलंब झालेला आहे.

सदर इमारत जून, २०१७ पर्यंत संबंधित विभागास हस्तांतरीत करण्याचे प्रयोजन आहे.

---

### माढा (जि. सोलापुर) तालुक्यातील पापनस ते वडशिंगे माढा येथून पंढरपुरकडे जाणाऱ्या श्रीसंत मुक्ताबाई पालखी मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५०) ७०४३३ (१६-११-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापुर) तालुक्यातील पापनस ते वडशिंगे माढा येथून पंढरपुरकडे जाणाऱ्या श्रीसंत मुक्ताबाई पालखी मार्गाची दुरवस्था झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदरचा मार्ग पालखी मार्ग म्हणून घोषित करुन निधी उपलब्ध करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१६) :**(१) अशंत: खरे आहे.
(२) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) व (४) रस्त्याच्या काही लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाची कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.